महाराष्ट्र शासन- कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. - ०२२-२२१६३३५१ ई-मेल - mahapocra@gmail.com

जा. क्र. नादेकृसंप्रर-१२२४/ मृदा विज्ञान/ प्र क्र १३३/ १०८८ दि: १८ /१२/२०२४

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नाशिक

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे

३. प्रकल्प अधिकारी (आत्मा), प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे

४. उपविभागीय कृषि अधिकारी, प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व उपविभाग

विषय- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा -२ बाबत ...

संदर्भ- १. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र नादेकृ ४६२२/प्र.क्र. ९४/८-अे दि. ३०.६.२०२३

२. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र नादेकृ ४६२२/प्र.क्र. ९४/८-अे दि१४.१०.२०२४

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकडून प्रकल्प टप्पा-२ करिता महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड, हिंगोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव, नाशिक या २१ जिल्ह्यातील ७२०१ गावांच्या निवडीस संदर्भीय शासन निर्णय २ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी (विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा), उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक) यांचेमार्फत करावयाची आहे.

प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, शेतीविषयक नवीन संशोधनाचा उन्नत शेतीसाठी उपयोग, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी उपाययोजना करणे व त्यायोगे शेतीमधील कर्ब उत्सर्जन कमी करणे, शेतीमध्ये कर्बग्रहण वाढविणे, संवर्धित पुनरुज्जीवित शेती या हवामान शेती पद्धतीचा वापर करून पिकांची उत्पादकता वाढविणे, पौष्टिक तृणधान्य उत्पादनावर भर देणे, हवामान अनुकूल तंत्रज्ञानासाठी विविध संशोधन संस्थांबरोबर भागीदारी करणे या महत्त्वाच्या बाबी प्रकल्पातून राबविण्याच्या आहेत.

त्यानुसार सद्यस्थितीत प्रकल्पाची आखणी व प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करावयाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कामकाजास जिल्हास्तरावरून सुरूवात करावयाची आहे.

१. ग्राम कृषि विकास समिती अध्यक्ष व सदस्यांची माहिती प्रकल्पाच्या वेब-पोर्टलवर भरण्याबाबत कृषि सहाय्यकांना सूचित करावे.

२. प्रकल्पासाठी निवडलेल्या गावांचे सरपंच आणि ग्राम कृषी विकास समितीच्या सदस्यांचे प्रशिक्षण शासनाच्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) मार्फत आयोजित करण्यात येणार आहे. त्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित झाल्यावर संबंधित प्रशिक्षणास उपस्थित राहतील, याची दक्षता घेणेस कृषि सहाय्यक यांना सूचित करावे.

३. प्रकल्प गावांचा प्रकल्प आराखाडा (गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा) तयार करण्यासाठी कृषी सहाय्यकांचे प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेति) मार्फत आयोजित करण्यात येणार आहे. त्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित झाल्यावर संबंधितांस प्रशिक्षणास उपस्थित राहणेबाबत सूचित करावे.

४. प्रकल्प गावात सुक्ष्मनियोजन प्रक्रिया सुरू करावयाची आहे व त्यानुसार गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करावयाचा आहे. त्याकरिता प्रकल्पाने विकसित केलेले MLP App मध्ये मुलभूत माहिती भरणेचे कामकाज करणेविषयी कृषि सहाय्यकांना सूचित करावे. तसेच सुक्ष्मनियोजन प्रक्रिया वेळापत्रक तयार करून प्रक्रिया पार पाडणेबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना सूचित करावे.

५. प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तसेच प्रकल्पाच्या अन्य पुस्तिका तयार करण्यासाठी वेळोवेळी लागणारी माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

६. प्रकल्प टप्पा-२ कार्यान्वित झाला असलेबाबत्वी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, आमदार व लोकप्रतिनिधी यांना देण्यात यावी.

तरी प्रकल्प टप्पा-२ च्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून उक्त नमूद तसेच वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे पालन करणेविषयी आपले स्तरावरून क्षेत्रीय कार्यालयांस कळविण्यात यावे.

Parimal
18/12

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक

प्रत- माहितीसाठी

१. मा. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

२. आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, म. रा., पुणे